## लो० टिळक

## यांचा

# पोवाडा ———— : १६ :

जय **लोकमान्य श्री बाळ गंगाधर** । भूषण झाला जगताला वं
नरवीर । जगण्याचा मंत्र ज्यानं दिला । केला उपकार । देशार्थ नित्य
तळमळ । गरिबांचा मोठा आधार । बडा झुंजार ॥ धृ० ॥

• •

### चौक १ ला

स्वातंत्र्यसूर्य मावळला । जन सारा व्याकुळ झाला ।। परवशता खा
जिवाला । मुळिं चैन नसे हृदयाला ॥ मोहनाग पाया डसला । मग
विवेक मरुनी गेला ॥ चाल ॥ पाश्चात्य चांगले सारे । पौर्वात्य तृणासम
झाले । जन सारे मोहुनि गेले ॥ चाल ॥ नोकरींत जो तो रमला
मोहानें भरुनी गेला ॥ चाल ॥ अशा वेळीं लोकमान्य बाळ आल
जन्माला ॥ १८५६ सालाला ।: जुलैच्या तेवीस तारखेला । रत्नागिरी
शहरांत याचा जन्म जाहला ॥ रत्नागिरी जिल्ह्याला सांपडला हा हिरा
मग बाळ गेला **पुण्याला** । बाळ मोठा बुद्धिवान झाला । झपझ
परीक्षेच्या पायऱ्या चढून हो गेला ॥ १८७६ सालाला । बाळ बी. ए
पहिल्या वर्गांत पास हो झाला । १८७९ ला । वकिलीची परीक्षा दिल
त्यानं त्या वेळा ॥ इंग्रजांची नोकरी कां जनतेची सेवा–हा विचा
बाळानं केला । अन् राष्ट्राची सेवा करण्याचा विडा उचलला



१८८० सालाला । **न्यू इंग्लिश स्कूल** सुरू केलं ज्ञान देण्याला ॥ १८८१ साला । **केसरी–मराठा** पत्रं आलीं जन्माला ॥ १८८२ सालाला । १०१ दिवसांची शिक्षा झाली बाळाला ॥ १८९७ साला । दीड वर्ष सक्त मजुरीची शिक्षा बाळाला ॥ १९०८ व्या सालाला । सहा वर्षे काळेपाणी शिक्षा दिली वीराला ॥ तंव प्रेतकळा आली पुण्याला । सगळीकडं हाहाकार झाला । १९१४ सालाला । तुरुंगातनं सोडलं वीराला । पुन्हां नवकळा आली पुण्याला । पण कामाचा ताण जीवाला । देह सारखा खंगतच गेला । अन् १९२० सालाला । एक ऑगस्टच्या हो दिवसाला । **लोकमान्य टिळक भास्कर गेला अस्ताला** ॥ १ ॥

• •

### चौक २ रा

" **स्वराज्य माझा जन्मसिद्ध हा हक्क मंत्र हा राष्ट्राला** । देउनि त्यानें जड राष्ट्राचा वृक्ष पुन्हां हा टवटविला ॥ राज्य इंग्रजी जणू पूतना आली प्राण हरायाला । बाळकृष्णानें अतुलबलानें देह तिचा जर्जर केला ॥ जी ॥ कर्मयोगाचा बोध कराया कृष्ण धावला त्या वेळा । **गीतारहस्य** लिहुनी यानें तोच बोध राष्ट्रास दिला ।। जी ॥ अपार बुद्धि, अपार शक्ति, अपार तळमळ जीवाला । पुरुष असे हे जन्मा येती अपार कार्यें करण्याला ।। जी ॥ चाल ॥ धुतलेल्या तांदळासारखं ज्याचं हो शील ॥ विवेकाचं आणि बुद्धीचं मोठं भांडार ॥ समुद्राच्या सारखा गंभीर । मेरुसारखा सदा जो स्थिर । वटवृक्ष जसा गरिबांचा मोठा आधार ॥ दुःखाचे आले डोंगर । तरि बुद्धि ज्याची खंबीर । बाळ गंगाधर अभिधान । मानाचं स्थान । करांव स्मरण । होई कल्याण ॥ २ ॥

• •

## चौक ३ रा

लोकमान्य टिळकांची सेवा आली फळाला या वेळा। भारत आता स्वतंत्र झाला जगताच्या कल्याणाला॥ लोकमान्य तूं, पुरुषोत्तम तूं, कर्मयोगी तूं, तूं वीर। वंदन करितों हात जोडुनी **पांडुरंग हा** शाहीर॥ ३ ॥

रचना–१ ऑगस्ट १९६०.